# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.04.2026** **वारः सोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग यांच्यात आज नवी दिल्लीत चर्चा
2. भारत आणि अमेरिकेतील द्विपक्षीय व्यापार कराराबाबत प्रत्यक्ष चर्चेला आजपासून सुरूवात
3. अमेरिकेबरोबर चर्चेच्या दुसऱ्या फेरीला इराणचा नकार; तर अमेरिकेचे प्रतिनिधी वाटाघाटींसाठी पाकिस्तानात दाखल होणार असल्याचा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा
4. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभा प्रचाराची रणधुमाळी आणि
5. देशाच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याचा इशारा; तर काही भागात पावसाचा अंदाज

**<u>दक्षिण कोरिया</u>**

दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी काल नवी दिल्लीत दाखल झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष म्युंग यांच्यात आज बैठक होणार आहे. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांसह, विविध क्षेत्रांमधील द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्यावर ते चर्चा करतील. जहाजबांधणी, व्यापार, गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर्स, उदयोन्मुख तंत्रज्ञान, नागरी संबंध आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या विषयांवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होईल. राष्ट्राध्यक्ष म्युंग आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यातही चर्चा होणार आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी काल राष्ट्राध्यक्ष म्युंग यांची भेट घेतली. या चर्चेमुळे दोन्ही देशांमधील 'विशेष धोरणात्मक भागीदारी' अधिक बळकट होईल असा विश्वास जयशंकर यांनी व्यक्त केला.

**<u>भारत-अमेरिका</u>**

भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराबाबत प्रत्यक्ष चर्चा आजपासून पुन्हा सुरू होणार आहे. या तीन दिवसांच्या चर्चेसाठी भारताचं वरिष्ठ पातळीवरील शिष्टमंडळ वॉशिंग्टनला रवाना झालं आहे. वाणिज्य विभागाचे वरिष्ठ सचिव दर्पण जैन यांच्या नेतृत्वाखालील भारतीय शिष्टमंडळात वाणिज्य, सीमाशुल्क आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. गेल्या सुमारे चार महिन्यांनंतर दोन्ही देशांमध्ये ही पहिली प्रत्यक्ष बैठक होत आहे. अमेरिकेने नव्याने लादलेल्या आयात शुल्कानंतर, भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराबाबत पुन्हा आढावा घेण्याच्या दृष्टीनं ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

**<u>राधाकृष्णन-श्रीलंका</u>**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन कालपासून श्रीलंका दौऱ्यावर आहेत. आपल्या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी उपराष्ट्रपतींनी, राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके आणि पंतप्रधान हरिणी अमरासूरिया यांच्याशी विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याबाबत विस्तारानं चर्चा केली. उपराष्ट्रपतींनी काल श्रीलंकेतील राहणाऱ्या भारतीयांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी प्रवासी भारतीय योजनेचा विस्तार आणि वाढीव शैक्षणिक शिष्यवृत्तीची घोषणा केली. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज नुवारा एलिया येथे भेट देणार आहेत. भारताच्या सहकार्याने उभारण्यात येत असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांनाही ते भेट देतील तसंच भारतीय वंशाच्या तमिळ समुदायाशी ते संवाद साधतील.

**शांतता फेरी नकार**

अमेरिकेबरोबर शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीला सहमती नसल्याचं इराणनं म्हटलं आहे. अमेरिकेचे प्रतिनिधी आज रात्री वाटाघाटींसाठी पाकिस्तानात दाखल होतील, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं; इराणनं मात्र या चर्चेची शक्यता फेटाळली आहे.

अमेरिकेच्या अवाजवी मागण्या, अवास्तव अपेक्षा, भूमिकेतले सततचे बदल, वारंवार होणारे विरोधाभास आणि सुरू असलेली नौदल नाकेबंदी या सर्व कारणांमुळे अमेरिकेबरोबर चर्चा होऊ शकत नाही, असं इराणची अधिकृत वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. अमेरिकेची नाकेबंदी ही युद्धविरामाच्या अटींचं उल्लंघन असल्याचं इराणनं म्हटलं आहे.

इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली असून, व्यापारी जहाजांना परवानगी घेणे आणि मंजूर केलेल्या मार्गांचं पालन करणं बंधनकारक आहे. परवानगीशिवाय पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या जहाजांना लक्ष्य केलं जाऊ शकतं असा इशाराही इराणनं दिला आहे.

**इराण जहाज-ट्रम्प**

दरम्यान अमेरिकेनं काल होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ नौदल नाकेबंदीचं उल्लंघन करण्याचा प्रयत्न करणारं एक इराणी मालवाहू जहाज ताब्यात घेतलं अशी माहिती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरून दिली आहे. गेल्या आठवड्यात नाकेबंदी सुरू झाल्यापासूनची ही अशा प्रकारची पहिलीच कारवाई असल्याचं त्यांनी सांगितलं. ओमानच्या आखातात इराणच्या 'तुस्का' या जहाजाला थांबण्याचा इशारा देऊनही, ते नं थांबल्यामुळे अमेरिकेच्या नौदलानं इंजिन रूममध्ये स्फोट करून त्या जहाजाला थांबवलं. हे जहाज आता अमेरिकी नौदलाच्या ताब्यात आहे, असं ट्रम्प यांनी सांगितलं आहे.

**विधानसभा-प्रचार**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. प्रचारासाठी केवळ दोनच दिवस शिल्लक राहिले असल्यानं विविध पक्षांचे स्टार प्रचारक आपल्या उमेदवारांच्या समर्थनार्थ जोरदार प्रचार करत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात येत्या 23 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात भूतानच्या सीमेलगतच्या भागात मतदान होणार असल्याने भूतानने प्रमुख आंतरराष्ट्रीय सीमा चौक्या आज संध्याकाळपासून तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याची घोषणा केली आहे.

**महिला-मोदी**

दरम्यान पंतप्रधान आणि भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी काल पश्चिम बंगालमधील बांकुरा जिल्ह्यातील बिष्णुपूर इथं जाहीर सभा घेतली. देशाच्या विकासासाठी महिलांनी मोठ्या संख्येनं राजकारणात सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी मोदी यांनी तृणमूल कॉंग्रेस आणि कॉंग्रेस पक्षावर जोरदार टीका केली. महिलांना 2029 पासून आरक्षण देणाऱ्या विधेयकाला अडथळा आणण्यासाठी या दोन्ही पक्षांनी कट रचल्याचा आरोप त्यांनी केला. भारतीय जनता पक्ष महिलांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असून, त्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत असल्याचंही मोदी यावेळी म्हणाले.

**तमिळनाडू**

तमिळनाडूमध्येही विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. आज आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू तामिळनाडूमध्ये एनडीए उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत. मुखमंत्री स्टॅलिन देखील आज चेन्नईमध्ये रोड शो घेणार आहेत, तसंच ठिकठिकाणी त्यांच्या जाहीर सभा देखील होणार आहेत.

**रस्ते-सर्वोच्च न्यायालय**

देशभरातील रस्ते सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण पावलं उचलत सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा केली आहे. देशातील एकंदर रस्त्यांमध्ये राष्ट्रीय महामार्गांचा वाटा 2 टक्के असला तरी, रस्ते अपघातांमधील मृत्यूंपैकी जवळपास 30 टक्के मृत्यू याच महामार्गांवर होतात असं निरीक्षण न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि ए एस चांदूरकर यांच्या खंडपीठाने नोंदवलं आहे. कोणतेही जड किंवा व्यावसायिक वाहन राष्ट्रीय महामार्गावर किंवा त्याच्या कडेला उभं केलं जाणार नाही किंवा थांबवलं जाणार नाही; केवळ अधिकृत सुविधा केंद्रांवरच त्यांना थांबता येईल, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. राष्ट्रीय महामार्गांच्या हद्दीत कोणत्याही नवीन उपहारगृहाचे किंवा व्यावसायिक वास्तूचे बांधकाम किंवा कार्यान्वयन करण्यासही न्यायालयानं तात्काळ प्रभावानं बंदी घातली आहे.

दरम्यान, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणतसेच सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना महामार्गावरील सुरक्षितता सुधारण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

## अपघात

तामिळनाडूमध्ये मुथुलिंगापुरम इथल्या एका फटाक्यांच्या कारखान्यात काल झालेल्या स्फोटात 23 कामगारांचा मृत्यू झाला तर 6 जण गंभीर जखमी झाले आहेत. कारखान्यातला ज्वलनशील रासायनिक पदार्थ हलवला जाताना हा स्फोट झाला. दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. तामिळनाडूमधल्या दुर्घटनेत झालेल्या जीवित हानीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

## क्रिकेट

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रात्री पंजाब किंग्ज संघानं लखनौ सुपर जायंट्स संघावर 54 धावांनी विजय मिळवला. पंजाब किंग्जचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. आज संध्याकाळी, अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर, गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स या संघांमध्ये सामना होणार आहे.

## हवामान

राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगड आणि झारखंड या भागांत आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे तर अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालय या राज्यांतील काही ठिकाणी उद्यापर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उन्हाची काहिली वाढली आहे. अकोला जिल्ह्यात कमाल तापमानाने 45 अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. गोंदिया आणि चंद्रपूरसह विदर्भातील काही भागातही उष्णता प्रचंड वाढली आहे. तर दुसरीकडे सांगली सोलापूरमध्ये काल पावसाने हजेरी लावली.

महाराष्ट्रात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात येत्या 25 तारखेपर्यंत, तर विदर्भात 22 तारखेपर्यंत तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा दिला असून काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावीत असं आवाहन करण्यात आलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.